—: प्रेस नोट :—

दिनांक : ०५.०७.२०१८

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २५/२०१८ |
| कलम | कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) भ्र. प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपी व कार्यालय | श्रीमती सुनंदा चिंतामण मोरे,वय ५२वर्षे, पद —सह दुय्यम निबंधक वर्ग —२, (अभिलेख कक्ष), बांद्रा मुंबई उपनगर,<br>कार्यालय — म्हाडा कार्यालयाच्या इमारतीतील, सह जिल्हा निबंधक वर्ग—२ (अभिलेख) यांचे कार्यालय, बांद्रा मुबई उपनगर, बांद्रा, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. २,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. २,०००/— |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हे व्यवसायाने स्टॅम्प रजिस्ट्रेशनचे लायझनर म्हणून काम करतात. फिर्यादी यांचे एका अशिलाच्या प्रॉपर्टी संदर्भात इंडेक्सची प्रत म्हाडा कार्यालयाच्या इमारतीतील, सह जिल्हा निबंधक वर्ग — २ (अभिलेख) यांचे कार्यालय, बांद्रा, मुंबई उपनगर, म्हाडा रूम नं. २ व १३ या कार्यालयातून प्राप्त करावयाची होती. त्यानुसार फिर्यादी हे दिनांक १५.०६.२०१८ रोजी नमुद कार्यालयात गेले असता, त्या कार्यालयातील महिला लोकसेवक श्रीमती सुनंदा चिंतामण मोरे, सह दुय्यम निबंधक वर्ग —२, (अभिलेख कक्ष), बांद्रा मुंबई उपनगर, यांना भेटून त्यांचे कामा संदर्भात अर्ज दाखल करून घेण्याची विनंती केली असता, आलोसे महिला श्रीमती सुनंदा मोरे यांनी फिर्यादी यांचेकडे वर नमूद काम करण्याकरीता रू. २,०००/— इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली.<br>फिर्यादींना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयात तक्रार दिली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. ०४.०७.२०१८ रोजी पडताळणी केली असता पडताळणी कारवाईत लोकसेवक श्रीमती सुनंदा चिंतामण मोरे यांनी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने आलोसे यांच्या कार्यालयात दि. ०५.०७.२०१८ रोजी सापळा रचण्यात आला. सापळा कारवाईत आलोसे श्रीमती सुनंदा मोरे यांनी फिर्यादीकडून रू.२,०००/— लाच स्विकारल्यानंतर रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.
टोल फ्री क्र.१०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२,फॅक्स क्र.०२२—२४९२२६१८,
वेबसाईट —acbmaharashtra.gov.in,ईमेल :acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक - www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net
व्हॉट्स ॲप क्रमांक —९९३०९९७७००

(निलम वाव्हळ)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
ला.प्र.वि.,मुंबई विभाग, मुंबई.